MHND270004542019

**नि.दि.दा.क्र. ६०/२०१९**
**बाहदुर वि. सुदाम**

## निशानी ५ वरील आदेश
## (पारीत दि. ०९/०३/२०२१)

१) वादींनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे व कलम १५१ प्रमाणे प्रतिवादी विरूध्द त्यांनी किंवा त्यांच्या मार्फत इतर कोणीही वादींच्या दावा मिळकती वरील ताब्यास हरकत अडथळा करु नये असा तात्पूरता मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२) वादींचा अर्ज वाचला. प्रतिवादीने नि.१९ वर पुरसीस दाखल केली व त्याचा लेखी जबाब हाच या अर्जावर म्हणणे समजण्यात यावे असे नमूद केले. त्यामुळे मी प्रतिवादीचा लेखी जबाब नि.१७ चे अवलोकन केले.

३) वादींचे विधिज्ञ श्री. टी. एन. पाटील व प्रतिवादीचे विधिज्ञ श्री. ए.एन.हामंद यांचा युक्तीवाद ऐकला.

४) वादींच्या व प्रतिवादीच्या वधिज्ञांचा युक्तीवाद विचारात घेतल्यानंतर माझे समक्ष खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले व सदरचे मुद्दे व त्यावरील मी माझे निष्कर्ष खालील कारणांसहीत देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | प्रथमदर्शनी दावा वादीच्या बाजुने आहे काय? | नाही |

| | | |
|---|---|---|
| २) | न्यायाचा समतोल वादींच्या बाजुने आहे काय ? | नाही |
| ३) | जर तात्पूरता मनाई हुकूम दिला नाही तर वादींचे कधीही न भरून निघणारे नुकसान होईल काय? | नाही |
| ४) | काय आदेश ? | अर्ज नामंजुर करण्यात येत आहे |

## कारणमिमांसा

**मुददा क्र. १ ते ४ करीताः**

५) सदरचे मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्यांची उत्तरे मी एकत्रीत नोंदवित आहे.

६) वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी विरूध्द त्यांनी मौ. मुदखेड, ता.मुदखेड येथील जमीन गट क्र.६४८ क्षेत्र ९७ आर या मिळकतीवरील त्यांचा ताबा व वहितीस प्रतिवादी किंवा त्याच्या मार्फत ईतर कोणीही हरकत अडथळा करु नये म्हणून कायमचा मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

७) प्रस्तूत अर्जामध्ये वादींनी त्यांच्या दावा मिळकतीवरील ताबा व वहितीस प्रतिवादी किंवा त्याच्या मार्फत ईतर कोणीही हरकत अडथळा करु नये म्हणून तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याची विनंती केलेली आहे.

८) वादींच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, दावा मिळकत ही वादींची वडिलोपार्जीत मिळकत आहे. वादींचे वडील गोजू दगडू वारकरे हे दावा मळकतीचे मालक व ताबेदार होते व ते दि. ३०.११.२००४ रोजी मयत झालेले आहेत. त्यांच्या मृत्युनंतर वादी हे दावा मिळकतीचे मालक व ताबेदार आहेत. प्रतिवादी हे दावा मिळकतीच्या लगतचे कब्जेदार आहेत. वादी क्र.१ ने उप-अधिक्षक, भूमि अभिलेख,

मुदखेड यांच्याकडे दावा मिळकतीची मोजणी करुन हद्दी निश्चित करण्यासाठी अर्ज दाखल केलेला होता. त्यानुसार दावा मिळकतीची उप–अधीक्षक भूमि अभिलेख यांच्या मार्फत दि. ०१.१०.२०१८ रोजी मोजणी करुन हद्दी निश्चित करण्यात आल्या व मोजणीचा नकाशा तयार करण्यात आला. मोजणीच्या वेळी प्रतिवादी तसेच लगतचे कब्जेदार हजर होते. दि.१०.०७.२०१९ वादी हे दावा मिळकतीमध्ये सोयाबिन पेरण्यासाठी गेले असता प्रतिवादी हा इतर लोकांना घेवून आला व त्यांनी वादींना दावा मिळकतीमध्ये पेरणी करावयाची नाही अशी धमकी दिली व दावा मिळकतीच्या हददी खुना काढून टाकण्याचा प्रयत्न केला. प्रथमदर्शनी दावा व न्यायाचा समतोल वादींच्या बाजुने आहे. जर प्रतिवादीने असाच हरकत अडथळा सुरु ठेवला तर वादींना दावा मिळकतीचा उपभोग घेता येणार नाही व वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल करिता अर्ज मंजूर करावे अशी विनंती केली.

९) प्रतिवादीच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, दावा मिळकतीची त्यांच्या समक्ष मोजणी झालेली नाही व त्याने वादींच्या दावा मिळकतीवरील ताब्यास अडथळा केलेला नाही. उलटपक्षी वादी हेच प्रतिवादीच्या मिळकतीवरील ताब्यास अडथळा करुन त्यांना बेदखल करण्याचा प्रयत्न करीत आहेत. वादींनी प्रस्तुतचा दावा दि.०१.१०.२०१८ रोजी उप–अधिक्षक भूमि अभिलेख यांनी केलेल्या मोजणीच्या आधारे दाखल केलेला आहे. परंतु उप–अधिक्षक भुमी अभिलेख यांनी ३१.०७.२०२० रोजी वादीला पत्र पाठवून सदर मोजणी रद्द केल्याचे नमूद केलेले आहे. तसेच सदर मोजणी नकलेचा आपण कोणत्याही शासकीय कामासाठी वापर करु नये असे वादीस कळविलेले आहे. त्यामुळे दावा मिळकतीवर वादींचा ताबा आहे असे म्हणता येणार नाही. प्रथमदर्शनी दावा व न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने नाही. जर तात्पुरता मनाई हुकूम दिला नाही तर वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट पक्षी प्रतिवादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल करिता अर्ज नामंजूर करावे अशी विनंती केलेली आहे.

१०) प्रस्तुतचा दावा हा कायमचा मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला

आहे. वादींच्या कथनानुसार ते दावा मिळकतीच्या ताब्यात आहेत. वादींनी ते दावा मिळकतीच्या ताब्यात असल्या बाबत दावा मिळकतीचा ७/१२ उतारा दाखल केलेला आहे. सदर ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीच्या व वादीच्या भावाच्या नावे ९७ आर क्षेत्राची नोंद झाल्याचे दिसून येते. वादींनी उप–अधिक्षक भूमि अभिलेख मुदखेड यांनी दिलेल्या मोजणीच्या नकाशाची 'क' प्रत दाव्यामध्ये दाखल केलेल आहे. सदर नकाशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जमीन गट नं.६४८ ची दि.०१.१०.२०१८ रोजी उप–अधिक्षक भूमि अभिलेख मुदखेड यांच्या मार्फत मोजणी केलेली आहे. सदर नकाशामध्ये जमीन गट नं.६४८ मधील १८ आर क्षेत्र जमीन गट नं.८४९ च्या ताबे वहिवाटीत दर्शविलेली आहे. यावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, वादींच्या दावा मिळकतीमध्ये जमीन गट नं. ८४९ च्या जमीन धारकांनी १८ आर क्षेत्रावर अतिक्रमण केलेले आहे.

**११)** प्रतिवादीने दि.२४.०४.२०२० रोजी उप–अधिक्षक भूमि अभिलेख, मदुखेड यांनी वादीला पाठविलेल्या नोटीसीची प्रत दाखल केलेली आहे. सदर नोटीसचे अवलोकन केले असता असे दिसून येते की उप–अधिक्षक भूमि अभिलेख, मदुखेड यांनी सदरची नोटीस वादीला पाठविलेली आहे. सदर नोटीस मध्ये असे नमूद केलेले आहे की, जमीन गट नं.६४८ ची दि.०१.१०.२०१८ रोजी मोजणी केली व दि.०५.११.२०१८ रोजी हद्दीच्या खुणा कायम करुन देण्यात आल्या. त्यानंतर १८.०६.२०२० रोजी प्रतिवादीची जमीन गट नं.८४९ ची मोजणी करण्यात आली. सदर नोटीसीमध्ये असे नमूद केलेले आहे की, दावा मिळकत गट नं.६४८ ही सर्वे नं. २१८ चा भाग आहे व अभिलेखा प्रमाणे सर्वे नं. २१८ चे क्षेत्रफळ ९ हेक्टर ८ आर ईतके आहे. सदर नोटीसमध्ये पुढे असे नमुद केलेले आहे की, सर्वे नं. २१८ चे उप–संचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद यांच्याकडील अधिसुचना क्रमांक/कॉन/एस.आर/५५०/१ नांदेड १९८४ दि.१२.१२.१९८४ अन्वये गट नं.८४८,८५०,६४७,८४९ व ६४८ असे पाडण्यात आलेले आहेत. सदर नोटीसमध्ये पुढे असे नमूद केलेले आहे की, चालू ७/१२ उता–यावर गट नं.८४८ चे क्षेत्र १ हेक्टर ८ आर, गट नं.८५० चे क्षेत्र २ हेक्टर १० आर, गट नं.६४७ चे क्षेत्र

३ हेक्टर ४१ आर, गट नं.८४९ चे क्षेत्र १ हेक्टर ७२ आर व गट नं.६४८ चे क्षेत्र १ हेक्टर २७ आर म्हणजेच एकुण क्षेत्र ९ हेक्टर ५८ आर दर्शविलेले आहे. परंतु सर्वे नं.२१८ चे मूळ क्षेत्र फक्त ९ हेक्टर ८ आर आहे व चालू ७/१२ उता–यावर सदर गटामध्ये ५० आर क्षेत्र हे जास्तीचे दर्शविलेले आहे. सदर नोटीसमध्ये पुढे असे नमूद केलेले आहे की, मोजणीच्या वेळी वरील बाबींचा विचार करण्यात आलेला नाही. त्यामुळे दुरुस्ती केल्याशिवाय गटाच्या हद्दी कायम करता येत नाहीत. म्हणून वादीला वाढीव क्षेत्रा बाबत सक्षम प्राधिकारी यांच्यापुढे अपील करुन क्षेत्र दुरुस्त करुन घेण्याचे कळविलेले आहे. तसेच त्यांनी केलेली दि.०१.१०.२००८ रोजीची दावा मिळकतीची मोजणी रद्द केलेली आहे व वादीने सदर मोजणीच्या नकाशाच्या नकलेचा उपयोग शासकीय कामासाठी करु नये असे नमूद केलेले आहे.

**१२)** एकंदरीत उप–अधिक्षक भूमि अभिलेख मुदखेड यांनी दिलेल्या दि.२४.०७.२०२० रोजीच्या नोटीसीवरुन प्रथमदर्शनी असे स्पष्ट होते की, मूळ सर्वे नं.२१८ चे एकुण क्षेत ९ हेक्टर ८ आर ऐवढे होते. त्यानंतर सदर सर्वे नंबरचे गट नं.८४८, ८५०, ६४७, ८४९ व ६४८ असे पाच गट पडलेले आहेत. सदर पाच गट नंबरचे चालू उता–यावर दर्शविलेले क्षेत्र ९ हेक्टर ५८ आर आहे. यावरुन मूळ सर्वे नंबर २१८ च्या क्षेत्रापेक्षा ५० आर जास्तीचे क्षेत्र सदर ५ गट नंबरच्या चालू उता–यावर दर्शविल्याचे दिसून येते. प्रस्तूत दाव्यामध्ये दावा मिळकत ही गट नंबर ६४८ आहे. म्हणजेच दावा मिळकतीच्या ७/१२ उता–यावर सुध्दा जास्तीचे क्षेत्र दर्शविल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

**१३)** उप–अधिक्षक भूमि अभिलेख मुदखेड यांनी दि. २४.०७.२०२० रोजी पत्र दिल्यानंतर वादीने दावा मिळकतीवर दर्शविलेले ९७ आर क्षेत्र मुळ सर्वे नं. २१८ मधील क्षेत्रापेक्षा जास्तीचे नाही या बाबत प्रथमदर्शनी पुरवा दाखल करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी दि. ०५.०७.२०१९ रोजीच्या दावा मिळकतीच्या ७/१२ उता–या व्यतिरिक्त ईतर कोणतेही कागदपत्रे दाखल केलेले नाहीत. सदर ७/१२ उता–यावर वादींच्या नावे ९७ आर क्षेत्र दर्शविलेले आहे. परंतु उप–अधिक्षक भूमि

अभिलेख मुदखेड यांनी सदरचे क्षेत्र जास्तीचे दर्शविल्याचे त्यांच्या पत्रामध्ये नमूद केलेले आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी असे दिसून येते की, दावा मिळकतीमध्ये वादींच्या नावे जास्तीचे क्षेत्र दर्शविलेले असल्यामुळे संपुर्ण दावा मिळकतीवर वादीचा ताबा आहे असे म्हणता येणार नाही. उप–अधिक्षक, भुमी अभिलेख, मुदखेड यांनी वादीला दिलेल्या पत्रामध्ये सर्वे गटाच्या क्षेत्रमध्ये दुरुस्ती केल्याशिवाय गटाच्या हद्दी कायम करता येत नाहीत असे नमुद केलेले आहे. याव्यतिरिक्त उप–अधिक्षक, भुमी अभिलेख, मुदखेड यांनी सदर दि. ०१.१०.२०१८ रोजी झालेली दावा मिळकतीची मोजणी रदद केलेली आहे व त्या नकाशाचे शासकिय कामासाठी वापर करु नये म्हणुन वादीस कळविलेले आहे. त्यामुळे, प्रतिवादीने वादींच्या दावा मिळकतीवर अतिक्रमण केलेले आहे असे सुध्दा म्हणता येणार नाही. त्यामुळे, दावा मिळकतीच्या संपुर्ण ९७ आर क्षेत्रवर वादींचा ताबा आहे असे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही.

**१४)** कायमच्या मनाई हुकूमाच्या दाव्यामध्ये प्रथमदर्शनी दावा मिळकतीवर वादींचा ताबा आहे हे सिध्द करण्याची जबाबदारी वादींची आहे. परंतु वादींनी संपुर्ण दावा मिळकतीवर त्यांचा ताबा आहे हे प्रथमदर्शनी सिध्द केलेले नाही. संपुर्ण दावा मिळकतीवर वादींचा ताबा नसल्यामुळे प्रथमदर्शनी दावा हा वादींच्या बाजुने नाही. न्यायाचा समतोल सुध्दा वादींच्या बाजुने नाही. संपुर्ण दावा मिळकतीवर वादींचा ताबा नसल्यामुळे तात्पुरता मनाई हुकूम दिला नाही तर वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट पक्षी प्रतिवादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. त्यामुळे वादींनी मागणी केल्या प्रमाणे तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यास पात्र नाहीत. करिता मी मुद्दा क्र.१ ते ३ ची उत्तरे नकारार्थी देत आहे.

**मुददा क्र.४ करीताः**

**१५)** मुददा क्र.१ ते ३ च्या नकारार्थी उत्तरावरून वादींचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. करीता मी मुद्दा क्र. ४ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आ दे श

| | |
|---|---|
| १) | वादींचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. |
| २) | या अर्जाचा खर्च मूळ दाव्यामध्ये समाविष्ठ करण्यात यावा. |

(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत.)

दि. ०९/०३/२०२१
मुदखेड

स्वाक्षरीत/-
**(दि.न.चामले)**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
मुदखेड, जि. नांदेड

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File judgment/order are same word to word, as per the original judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of the stenographer | : | A. A. Totre |
| Court Name | : | CJJD, Mudkhed |
| Date: | | 09/03/2021 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 09/03/2021 |
| Judgment/order Uploaded on | : | 09/03/2021 |